जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 8 APR 2026

तरुण भारत

# वचन साहित्य ज्ञानपरंपरा समृध्द करणारे

## जे. एस. पाटील यांचे प्रतिपादन : बसव व्याख्यानमाला

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

भारतीय संस्कृती अनुभवजन्य व अध्ययजन्य ज्ञानपरंपरेत विभागली असून शेकडो वर्षापासूनचे वचन साहित्य हे अध्ययजन्य ज्ञानपरंपरा समृद्ध करणारे आहे. वचन साहित्याने खऱ्या अर्थाने अनुभवावर आधारलेली चळवळ उभी केली, असे प्रतिपादन विजापूर येथील प्राचार्य डॉ. जे.एस.पाटील यांनी बुधवारी केले. शिवाजी विद्यापीठाचे शरण साहित्य अध्यासन व कोल्हापुरातील बसव केंद्राच्या वतीने शाहू स्मारक भवनात आयोजित बसव व्याख्यानमालेचे पहिले पुष्प डॉ.पाटील यांनी गुंफले. वचन साहित्य एक समृद्ध ज्ञान परंपरा या विषयावर त्यांनी मांडणी केली. प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील अध्यक्षस्थानी होते.जे.एस. पाटील म्हणाले, वचन साहित्य हे अनुभवातून आलेले साहित्य आहे.




बसव व्याख्यानमालेत बोलताना जे. एस. पाटील. मंचावर उपस्थित डॉ. तृप्ती करेकट्टी, दत्तात्रय पाटील, प्रभाकर कुलगुडे,सुरेश जांबुरे

आपल्या कृषी परंपरा, आर्थिक विषमता यावर अनुभवाद्वारे महात्मा बसवेश्वर यांनी वेगळ्या पद्धतीची मांडणी केली आहे. प्रत्येकाने कष्ट करावे, जितके हवे तितकेच स्वत:कडे ठेवून उरलेले समाजाला द्यावे हे तत्व महात्मा बसवेश्वर यांनी मांडले. शेकडो वर्षांपूर्वी त्यांनी मांडलेले हे तत्व आर्थिक समानतेसाठी उपयोगी ठरले. दत्तात्रय पाटील यांनीही वचन साहित्याची मांडणी केली. प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. ॲड. अंकिता त्रिभुवने यांनी सूत्रसंचालन केले. बाबुराव तारळी यांनी आभार मानले. यावेळी सुरेश जांबुरे, प्रभाकर कुलगुडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

18 APR 2026
सकाळ

# विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत 'सोनिक शिल्ड'ला द्वितीय क्रमांक

कोल्हापूर, ता. १७ : डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग विभागातील विद्यार्थ्यांच्या 'सोनिक शील्ड' स्टार्टअप कल्पनेला शिवाजी विद्यापीठात झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत द्वितीय क्रमांकाने गौरविण्यात आले. या स्टार्टअपसाठी ५० हजारांचे सीड फंडिंग प्राप्त झाले आहे.

शिवाजी विद्यापीठात इंटरनॅशनल अकॅडेमिया-इंडस्ट्री-गव्हर्नमेंट कॉन्क्लेव्ह (आयएआयजीसी २.०) चे आयोजन केले होते. यामध्ये विविध महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण स्टार्टअप कल्पना मांडल्या. यामध्ये या परिषदेत 'शार्क टँक कम हॅकेथॉन' स्पर्धेअंतर्गत आयटी आणि उदयोन्मुख गटात डी. वाय. पाटील अभियांत्रिकीच्या एआय-एमएल विभागच्या द्वितीय वर्षातील विद्यार्थी प्रणव यादव, योगेश अंकम, जैद शेख यांच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला.

# डॉ. आंबेडकरांचे विचार आंतरराष्ट्रीय केंद्रावर



कोल्हापूर(प्रतिनिधी):- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार केवळ भारतापुरते मर्यादित नसून जागतिक पातळीवर प्रभाव टाकणारे आहेत. आज जगभरात आंबेडकर जयंती साजरी होत असून, त्यांचे कार्य आणि विचार आंतरराष्ट्रीय बौद्धिक चर्चाविश्वाच्या केंद्रस्थानी आहे, असे प्रतिपादन पुणे येथील गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. प्रशांत बनसोडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती आकर्षक शोभायात्रेसह लेझीम, हलगीची सादरीकरणे आणि व्याख्याने अशा विविध कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्त फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत आयोजित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्य या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उपस्थित होत्या. डॉ. बनसोडे यांनी डॉ. आंबेडकर यांचा जागतिक प्रभाव स्पष्ट करीत असताना लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि जर्मनीतील बॉन विद्या पीठ येथे आपणाला आलेल्या व्यक्तीगत अनुभवांच्या आधारे विवेचन केले. ते म्हणाले, आंबेडकरांच्या वैचारिक जडणघडणीमध्ये अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठातील शिक्षणाचा मोठा प्रभाव राहिला.येथे त्यांचा लोकशाही,समानता, समाजवाद आणि सामाजिक न्याय यांसारख्या विचारधारांशी परिचय झाला. विशेषतः जॉन ड्युई यांच्या प्रागतिक विचारांचा प्रभाव आंबेडकरांच्या सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनात दिसून येतो. याशिवाय डॉ. आंबेडकरांनी कार्ल मार्क्स आणि भगवान बुद्ध यांच्या विचारांचे तुलनात्मक चिंतन करत स्वतःची स्वतंत्र विचार प्रणाली विकसित केली. सामाजिक क्रांती ही अहिंसक आणि लोकशाही मार्गाने घडवून आणण्याची त्यांची भूमिका डेमोक्रॅटिक सोशलिझम या चौकटीतून समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय स्तरावर आंबेडकरांना सोशल जस्टिस क्रुसेडर आणि ऑर्गनिक इंटेलेक्चुअल म्हणून मान्यता मिळाल्याचे सांगतानाच अँटॉनिओ ग्रामशी यांचा सिद्धांत आणि ड्यु बॉईस यांच्याशी वैचारिक संवादाच्या अनुषंगानेही विश्लेषण केले. याद्वारेच दलित व आफ्रो-अमेरिकन प्रश्नातील साम्य याबाबत बाबासाहेबांना विवेचन करण्याची प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आंबेडकरांना केवळ प्रतीक म्हणून नव्हे, तर त्यांच्या विचारांची सखोल शास्त्रीय मांडणी समजून घेऊन समाज परिवर्तनासाठी त्याचा उपयोग करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, डॉ. आंबेडकर यांनी सांगितलेला शिक्षणाचा खरा अर्थ आणि मानवाधिकार व समतेच्या विचारांची प्रस्तुतता विद्यार्थ्यांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. केवळ परीक्षेपुरते न शिकता, मिळवलेल्या ज्ञानावर चिंतन करून ते समाजात वापरण्याचा आणि स्वतःला एक परिपक्व माणूस म्हणून घडवणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याशी जोडलेला आहे, असे वाटते कारण महाराजांची शिकवण, सर्व जाती-धर्मांच्या लोकांना एकत्र करून केलेली संघटनात्मक बांधणी आणि रयतेच्या राज्यासाठी केलेला लढा हे त्याचेच उदाहरण वाटते. महामानवांच्या जयंती उत्सवातून केवळ तात्पुरता उत्साह न दाखविता आपल्या आयुष्याला आकार द्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या सुरवातीला अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी आभार मानले.

तत्पूर्वी, विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ.रामचंद्र पवार, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ.सावलीराम घाणे,डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. दीपा श्रावस्ती, डॉ. कैलास सोनवणे, डॉ.सुनील गायकवाड, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. राहुल माने, डॉ. नितीन कांबळे, डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. उत्तम सकट, सुरेश बंडगर, सुरेखा अडके आदींसह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यापीठाच्या वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सकाळी विद्यापीठाच्या प्रांगणातून भव्य अशी शोभायात्रा काढली. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता जिजाऊ साहेब, सावित्रीबाई फुले, माता रमाई,अण्णाभाऊ साठे, लहुजी साळवे आदी महामानवांच्या वेशभूषेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी अग्रस्थानी होते. सजवलेल्या घोडाबग्गीमध्ये डॉ. आंबेडकर यांचे भव्य छायाचित्र ठेवलेले होते. लेझीम, हलगी आणि ढोल, झांजपथकांच्या निनादात आणि स्फूर्तीगीते गात विद्यार्थ्यांनी महामानवाला आगळे अभिवादन केले. शोभायात्रेमध्ये प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह सर्व अधिकारी सहभागी झाले.

विद्यापीठाने फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत महामानवांवरील खुल्या रिल्स मेकिंग स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेला उदंड प्रतिसाद लाभला. त्याचे प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते पारितोषिक वितरण केले. या स्पर्धेचा निकाल अनुक्रमे असा: प्रतिभा जयसिंग जाधव (रु. ५००१/-, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), केदार सुरेश माने (रु. ३००१-, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), प्रेरणा आर. खटावकर (रु. २००१/-, सन्मानचिन्ह व प्रशस्ती पत्र), उत्तेजनार्थ- प्रकाश चांगदेव आवारे (प्रशस्तीपत्र) व कोमल चंद्रकांत गरड (प्रशस्तीपत्र).

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 APR 2026
लोकमत

# शरण चळवळींने माणूसपण दिले

## धनाजी गुरव : बसव व्याख्यानमालेची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** मनुस्मृतीने जातीय उतरंडीद्वारे जातीव्यवस्था पेरत महिलांसह अनेकांचे अस्तित्व नाकारले. मात्र, महात्मा बसवेश्वर आणि शरणांनी जातीअंताची लढाई लढत महिलांसह अनेकांना माणूसपण दिले, शरणांची ही चळवळ अकराव्या, बाराव्या शतकातील एक क्रांतिकारक अध्याय होता, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत धनाजी गुरव यांनी शुक्रवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या शरण साहित्य अध्यासन, बसव केंद्राच्यावतीने आयोजित बसव व्याख्यानमालेत गुरव यांनी शरण संकुल आणि सत्यशोधक समाज या विषयावर शेवटचे पुष्प गुंफले. व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. भारती पाटील होत्या.

धनाजी गुरव म्हणाले, शरण चळवळीने जो काम करेल तो श्रेष्ठ हे सूत्र समाजात बिंबवले. महिलांना मानाचे स्थान दिले. ज्यांना ज्यांना मनुस्मृतीने नाकारले त्या सर्वांना शरण चळवळीने माणूसपण दिले. यावेळी डॉ. तृप्ती करेकट्टी, सरलाताई पाटील, सदाशिव देवताळे, सुभाष झगडे उपस्थित होते. सुभाष महाजन यांनी प्रास्ताविक केले. ॲड. अंकिता त्रिभुवने यांनी सूत्रसंचालन केले. सरलाताई पाटील यांनी आभार मानले.

### मनाचा विचार करा

सध्याच्या काळात आपण केवळ माणसाच्या शरीराच्या गरजेचा विचार करतो. यामुळे आपल्या जाणीवा बोथट झाल्या आहेत. महात्मा बसवेश्वरांनी मात्र, मानवी मनाचा विचार केला. त्यांचे हे विचारच सामाजिक बदलाचे केंद्रबिंदू ठरल्याचे गुरव म्हणाले.

1 8 APR 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**लक्षवेधी** तीन महिन्यांपासून जोडीचे वास्तव्य : शिवाजी विद्यापीठाच्या समृद्ध जैवविविधतेवर शिक्कामोर्तब

# विद्यापीठात आढळला पांढऱ्या पोटाचा समुद्री गरुड

| प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ परिसरात दुर्मिळ पांढऱ्या पोटाच्या समुद्री गरूडाच्या (White bellied Sea Eagle) जोडीचे दर्शन झाले आहे. गेल्या तीन महिन्यांपासून ही जोडी विद्यापीठ परिसरात वास्तव्यास असून त्यामुळे विद्यापीठ परिसरातील सुरक्षित व समृद्ध पर्यावरणावर शिक्कामोर्तब झाले आहे.

समुद्री गरूडाच्या जोडीचे दर्शन झाल्याने जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण नोंद झाल्याचे विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आढळलेली पांढऱ्या पोटाच्या समुद्री गरुडाची जोडी.
(छाया : महेंद्र गायकवाड)

- **पक्षांच्या विविध १२६ प्रजातींची नोंद**

सुनील गायकवाड यांनी सांगितले.

विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ. सुनील गायकवाड आणि युवा पक्षीनिरीक्षक महेंद्र गायकवाड यांना फेब्रुवारी २०२६मध्ये सर्वप्रथम भाषा भवन तलाव परिसरात या जोडीचे दर्शन घडले. यापूर्वी डॉ. गायकवाड यांनी केलेल्या संशोधनानुसार, विद्यापीठ परिसरात पक्ष्यांच्या १२६ प्रजातींची नोंद झालेली आहे. आता या पक्ष्याच्या दर्शनाने त्यामध्ये महत्त्वाची नोंद समाविष्ट झाली आहे.

डॉ. गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, पांढऱ्या पोटाचा समुद्री गरूड हा प्रामुख्याने समुद्रकिनारी आढळणारा पक्षी आहे. मात्र, सुरक्षित वातावरण आणि मुबलक खाद्यसंपन्नता असलेल्या अंतर्गत भूभागाकडेही तो स्थलांतर करतो. सध्या विद्यापीठ परिसरात नर व मादी अशी जोडी आढळून आली असून, त्यामागे प्रजोत्पादनाचा हेतू असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीदेखील, त्यांनी अद्याप या परिसरात घरटे बांधल्याचे आढळलेले नाही. त्यामुळे त्याविषयी ठोस सांगता येणार नाही, असे डॉ. गायकवाड म्हणाले.

## समुद्री गरूडाविषयी थोडक्यात

**पांढऱ्या पोटाच्या समुद्री गरूडाचे शास्त्रीय नाव हॅलिएटस ल्युकोगॅस्टर आहे. हा पक्षी आकाराने मोठा असून मादी साधारणपणे नरापेक्षा मोठी असते. याची लांबी साधारण ७० ते ९० सेंमी दरम्यान असते, तर पंख पसरल्यावर (विंगस्पॅन) त्यांची रुंदी सुमारे १.८ ते २.२ मीटरपर्यंत पोहोचते. या गरूडाचे सर्वात ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्याचे शुभ्र डोके, मान, छाती आणि पोट. त्याची पाठ व पंख राखाडी रंगाचे असतात. शेपटी लहान व पूर्णपणे पांढरी असते. चोच मोठी, मजबूत व वाकडी असून ती करड्या–निळसर रंगाची असते. त्याची दृष्टी तीक्ष्ण असून शिकार पकडण्यासाठी त्याचे पाय व नखे अत्यंत शक्तिशाली असतात. तो प्रामुख्याने मासे, जलचर, लहान सस्तन प्राणी प्रसंगी मृत प्राण्यांवरही उपजीविका करतो.**

## शिकार किंवा व्यापार करणे गंभीर गुन्हा

**हा पक्षी वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ अंतर्गत अनुसूची–१ मध्ये समाविष्ट असून त्याला सर्वोच्च संरक्षण प्राप्त आहे. या श्रेणीतील पक्ष्यांची शिकार किंवा व्यापार करणे हा गंभीर गुन्हा असून, त्यासाठी कठोर शिक्षेची तरतूद आहे, अशी माहितीही डॉ. गायकवाड यांनी दिली.**

18 APR 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शिवाजी विद्यापीठात पांढऱ्या पोटाच्या समुद्री गरुडाचे दर्शन

## तीन महिन्यांपासून जोडीचे परिसरात वास्तव्य : समृद्ध व सुरक्षित जैवविविधतेवर शिक्कामोर्तब

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठ परिसरात दुर्मिळ मानल्या जाणाऱ्या पांढऱ्या पोटाच्या समुद्री गरूड पक्ष्याच्या जोडीचे दर्शन घडल्याने जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण नोंद झाली आहे. गेल्या तीन महिन्यांपासून ही जोडी विद्यापीठ परिसरात वास्तव्यास असून त्यामुळे विद्यापीठ परिसरातील सुरक्षित आणि समृद्ध पर्यावरणावर शिक्कामोर्तब झाले आहे.

विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ. सुनील गायकवाड आणि युवा पक्षीनिरीक्षक महेंद्र गायकवाड यांना फेब्रुवारी २०२६ मध्ये सर्वप्रथम भाषा भवन तलाव परिसरात या जोडीचे दर्शन घडले. तेव्हापासून त्यांचे येथे नियमित वास्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी डॉ. गायकवाड यांनी केलेल्या संशोधनानुसार, विद्यापीठ परिसरात पक्ष्यांच्या १२६ प्रजातींची आढळ नोंद झालेली आहे. आता या पक्ष्यांच्या दर्शनाने त्यामध्ये महत्त्वाची नोंद समाविष्ट झाली आहे. डॉ. गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार,पांढऱ्या पोटाचा समुद्री गरूड हा प्रामुख्याने समुद्रकिनारी आढळणारा पक्षी आहे. मात्र, सुरक्षित वातावरण आणि मुबलक खाद्यसंपन्नता असलेल्या अंतर्गत भूभागाकडेही तो स्थलांतर करतो. सध्या विद्यापीठ परिसरात नर व मादी अशी जोडी आढळून आली असून,जोडीने उपस्थिती असल्यामुळे त्यामागे प्रजोत्पादनाचा हेतू असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीदेखील, त्यांनी अद्याप या परिसरात घरटे बांधल्याचे आढळलेले नाही.





**शिवाजी विद्यापीठात जोडीने विहार करणाऱ्या पांढऱ्या पोटाच्या समुद्री गरुडाची जोडी. (छाया : महेंद्र गायकवाड)**

### शिकार, व्यापार करणे हा गंभीर गुन्हा

हा पक्षी वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ अंतर्गत अनुसूची-१ मध्ये समाविष्ट असून त्याला सर्वोच्च संरक्षण प्राप्त आहे. या श्रेणीत समाविष्ट पक्ष्यांची शिकार किंवा व्यापार करणे हा गंभीर गुन्हा असून, त्यासाठी कठोर शिक्षेची तरतूद आहे, अशी माहितीही डॉ. गायकवाड यांनी दिली.

### खाद्यसंपन्नतेमुळे हे पक्षी येथे थांबले

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठातील जलाशयांची पातळी कमी झाल्यामुळे मासे व इतर जलचर सहज उपलब्ध होत असल्याने खाद्यसंपन्नतेमुळे हे पक्षी येथे थांबले असावेत, असा अंदाज डॉ. गायकवाड यांनी यावेळी व्यक्त केला.

### वन्यजीव कायद्याच्या 'अनुसूची-१' मध्ये समाविष्ट पक्षी

पांढऱ्या पोटाच्या समुद्री गरूडाचे शास्त्रीय नाव हॅलिएटस ल्युकोगॅस्टर आहे. हा पक्षी आकाराने मोठा असून मादी साधारणपणे नरापेक्षा मोठी असते. याची लांबी साधारण ७० ते ९० सेंमी दरम्यान असते, तर पंख पसरल्यावर (विंग्सपॅन) त्यांची रुंदी सुमारे १.८ ते २.२ मीटरपर्यंत पोहोचते. पंख मिटल्यावर त्याचा आकार भरीव व मजबूत दिसतो. या गरूडाचे सर्वांत ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्याचे शुभ्र डोके, मान, छाती आणि पोट.त्याची पाठ व पंख राखाडी रंगाचे असतात. शेपटी लहान व पूर्णपणे पांढरी असते. चोच मोठी,मजबूत व वाकडी असून ती करड्या-निळसर रंगाची असते. त्याची दृष्टी तीक्ष्ण असून शिकार पकडण्यासाठी त्याचे पाय व नखे अत्यंत शक्तिशाली असतात.

18 APR 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात पांढऱ्या पोटाच्या समुद्री गरुडाची जोडी

## तीन महिन्यांपासून वास्तव्य : भाषाभवन तलावावर दर्शन


लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात, दुर्मीळ मानल्या जाणाऱ्या व्हाइट बेलीड सी ईगल या पक्ष्याच्या जोडीचे दर्शन घडल्याने जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण नोंद झाली आहे. गेल्या तीन महिन्यांपासून ही समुद्री गरुडाची जोडी विद्यापीठाच्या परिसरात वास्तव्यास असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ. सुनील गायकवाड आणि युवा पक्षिनिरीक्षक महेंद्र गायकवाड यांनी फेब्रुवारी २०२६ मध्ये भाषा भवन तलाव परिसरात या जोडीचे प्रथम दर्शन घेतले. त्यानंतर या पक्ष्यांचे नियमित वास्तव्य येथे असल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी विद्यापीठ परिसरात १२६ पक्षिप्रजातींची नोंद करण्यात आली असून, या नव्या नोंदीमुळे जैवविविधतेत आणखी भर पडली आहे. डॉ. गायकवाड यांच्या माहितीनुसार, पांढऱ्या पोटाचा समुद्री गरुड हा प्रामुख्याने समुद्रकिनारी आढळणारा पक्षी असला तरी, सुरक्षित वातावरण आणि मुबलक खाद्य उपलब्धतेमुळे तो अंतर्गत भागातही स्थलांतर करतो. सध्या परिसरात नर व मादी अशी जोडी आढळून आली असून, त्यांच्या उपस्थितीमागे प्रजोत्पादनाच्या हेतूची शक्यता व्यक्त केली जात आहे..

### सर्वोच्च संरक्षण मिळालेला अनुसूची १ मध्ये समाविष्ट पक्षी



व्हाइट बेलीड सी ईगल (शास्त्रीय नाव : हॅलिएटस ल्युकोगॅस्टर) हा आकाराने मोठा व शक्तिशाली पक्षी असून, त्याची लांबी साधारण ७० ते ९० सें.मी. असते, तर पंखांची रुंदी १.८ ते २.२ मीटरपर्यंत असते. शुभ्र डोके, मान व पोट ही त्याची ठळक वैशिष्ट्ये आहेत. हा पक्षी प्रामुख्याने मासे, जलचर व लहान प्राण्यांवर उपजीविका करतो. हा पक्षी वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ अंतर्गत अनुसूची-१ मध्ये समाविष्ट असून त्याला सर्वोच्च संरक्षण आहे. त्याची शिकार किंवा व्यापार करणे हा गंभीर गुन्हा मानला जातो.

> “ उन्हाळ्यात जलाशयांची पातळी घटल्याने मासे व इतर जलचर सहज उपलब्ध होत असल्याने हे पक्षी येथे थांबले असावेत. समुद्री प्रदूषण, पर्यटन प्रकल्प आणि बोटिंग यांसारख्या कारणांमुळेही त्यांच्या स्थलांतरावर परिणाम होत असावा.
>
> **प्रा. डॉ. सुनील गायकवाड, प्राणिशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ.**

जनसंपर्क कक्ष

18 APR 2026 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शरण चळवळीतून महिलांना मानाचे स्थान

## धनाजी गुरव : बसव व्याख्यानमालेचा समारोप

कोल्हापूर, ता. १७ : 'मनुस्मृतीने जातिव्यवस्था निर्माण करीत महिलांचे अस्तित्व नाकारले. मात्र, महात्मा बसवेश्वर आणि शरणांनी जातिअंताची लढाई लढत महिलांसह सर्वांना माणूसपण दिले. शरणांची ही चळवळ अकराव्या-बाराव्या शतकातील एक क्रांतिकारक अध्याय होता', असे प्रतिपादन धनाजी गुरव यांनी शुक्रवारी केले.



धनाजी गुरव

शिवाजी विद्यापीठाच्या शरण साहित्य अध्यासन व येथील बसव केंद्राच्या वतीने शाहू स्मारक भवन येथे आयोजित बसव व्याख्यानमालेत 'शरण संकुल आणि सत्यशोधक समाज' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. भारती पाटील होत्या. दरम्यान, आज व्याख्यानमालेचा समारोप झाला.

गुरव म्हणाले, 'महात्मा बसवेश्वर यांच्या सामाजिक कार्याची सुरुवात दक्षिण भारतात झाली. त्या काळात मनुस्मृतीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात होता. तरीही बसवेश्वरांनी सामाजिक बदलांची दिशा निवडत या विचारांना प्रभावी आव्हान दिले. यातूनच शरण चळवळीचा उदय झाला.

'जो काम करेल तो श्रेष्ठ' हे तत्त्व समाजात रुजवत या चळवळीने महिलांना मानाचे स्थान दिले. तसेच, मनुस्मृतीने ज्यांना नाकारले, त्या सर्वांना शरण चळवळीने माणूसपण दिले.'

यावेळी शिवाजी विद्यापीठ शरण साहित्य अध्यासन केंद्राच्या प्रा. तृप्ती करीकट्टी, सदाशिव देवताळे, सुभाष झगडे आदी उपस्थित होते. सुभाष महाजन यांनी प्रास्ताविक केले. ॲड. अंकिता त्रिभुवने यांनी सूत्रसंचालन केले. सरलाताई पाटील यांनी आभार मानले.

### बसव विचार सामाजिक बदलाचे केंद्रबिंदू

'आजच्या काळात आपण मानवी मनाचा विचार न करता शरीराच्या गरजांचा विचार करतो, त्यामुळे जाणिवा बोथट झाल्या आहेत. महात्मा बसवेश्वरांनी मात्र मानवी मनाचा विचार केला. त्यांचे विचारच सामाजिक बदलाचे केंद्रबिंदू ठरले', असेही गुरव यांनी स्पष्ट केले.

जनसंपर्क कक्ष

18 APR 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'अमृतानुभव' ग्रंथ नसून जीवन जगण्याचे तत्त्वज्ञान

## इंद्रजित देशमुख; महात्मा बसवण्णा व्याख्यानमाला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जीवनाच्या उद्धाराचा मार्ग संत दाखवितात, त्यामुळे ते वंदनीय आहेत. ज्ञानेश्वर माऊलींनी स्वतःला आलेला अद्वैताचा अनुभव 'अमृतानुभव'मध्ये शब्दबद्ध केला आहे. तो ग्रंथ नसून अनुभवाचे शास्त्र, जीवन जगण्याचे तत्त्वज्ञान आहे, असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी, संत साहित्याचे अभ्यासक इंद्रजित देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ शरण साहित्य अध्यासन आणि बसव केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'महात्मा बसवण्णा' यांच्या जयंतीनिमित्त आयोजित तीन दिवसीय व्याख्यानमालेत ते 'अमृतानुभवातील चिंतन' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी



**कोल्हापूर : बसव व्याख्यानमालेत बोलताना संत साहित्याचे अभ्यासक इंद्रजीत देशमुख. (छाया : मिलन मकानदार)**

प्राचार्य डॉ. जी. पी. माळी होते.

इंद्रजित देशमुख यांनी 'अमृतानुभव' या संत ज्ञानेश्वरांच्या दार्शनिक ग्रंथावर ओघवत्या व रसाळ भाषेत मांडले आहे. ते म्हणाले, 'अमृतानुभवा'त ज्ञानेश्वर माऊली केवळ आध्यात्मिक कोरडेपणा सांगितला नाही तर अमृतानुभवातील तत्त्वज्ञान दैनंदिन जीवनात कसे वापरावे हे सांगितले. त्याचप्रमाणे महात्मा बसवण्णा यांनी सामर्थ्याने सभोवताल सुंदर करीत जाण्याचा संदेश दिला.

कर्तृत्वशक्ती व इच्छा शक्तीमुळेच जीवन म्हणून जगत आहोत. निर्माण करणाऱ्याने माणसाला नियंत्रित करणारी शक्ती निर्माण केली. जीवन जगताना शरीर, मन आणि विश्वाचे दुःख भोगावे लागते. त्यामुळे अज्ञानाकडून ज्ञानाकडे व सुख-दुःखाकडून सुखरूपाकडे जाण्याचा मानवाचे प्रयत्न केल्यास मुक्ती, मोक्ष प्राप्त होईल. यश आंबोळे यांनी प्रास्ताविक केले. संध्या व्हनगुत्ते यांनी सूत्रसंचालन केले. शुभांगी चितारी यांनी आभार मानले. यावेळी डॉ. तृप्ती करेकट्टी, विलास आंबोळे, सुभाष महाजन आदी उपस्थित होते.